# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सक्षमीकरणाचे धोरण

**प्रा. अमर विलास डोणे** शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज मिरज मो. नं. ९०२१७२८७६४

Email- amardone2118@gmail.com

---

प्रस्तावना

भारतात महिलांचे उद्धारक अनेक झाले परंतु कैवारी मात्र एकच झाले, भारतरत्न बोधिसत्व परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर. तसे पहायला गेले तर 'महिला सक्षमीकरण' ही खूप व्यापक अशी गोष्ट आहे. या गोष्टीच्या मुळापर्यंत जायचे म्हटल्यास आपल्या भारत देशाची तत्कालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व शैक्षणिक परिस्थितीची सखोल चिकित्सा होणे अत्यंत आवश्यक आहे. आज आपल्याला भारतीय राज्यघटनेने जे स्वातंत्र्य बहाल केले आहे त्याचे फार मोठे महत्त्व आपल्याला असणे अत्यंत आवश्यक आहे. कुठल्याही बाह्य शक्तीशिवाय जो देश आपला अंतर्गत व परदेशी व्यवहार स्वावलंबी इच्छेने चालवू शकतो तो देश खऱ्या अर्थाने सार्वभौम असतो. जिथे सर्व जनता जनतेच्या इच्छेप्रमाणे व सर्व जनतेच्या हिताकरिता राजवट चालवते त्या ठिकाणी लोकशाही नांदत असते. जिथे सर्व स्त्री-पुरुष 'नागरिक' म्हणून सर्व दृष्टीने समर्थ असतात तिथे समाजवादी समाज अस्तित्वात असतो. घटनेच्या सरनाम्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील सर्व घटकांना नवसंजीवनी दिली आहे. स्त्री सक्षमीकरणाचा विषय महत्त्वाचा आणि काही प्रमाणात हास्याचा बनलेला आहे कारण खरेच इथल्या व्यवस्थेला महिला सक्षम व्हाव्यात, त्यांनी स्वतःचे निर्णय स्वतः घ्यावेत अशी खरीच व्यवस्थेची मानसिकता आहे काय? हा खरा प्रश्न आहे. स्त्रियांवर जी बंधने आहेत त्या सर्वांचे मूळ धर्मव्यवस्थेत पाहायला मिळते. धर्म व्यवस्थेने स्त्रियांना हक्क नाकारले त्यांना माणूस म्हणून जगण्याचे, विचार करण्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. त्यामुळे धार्मिक व संस्कृतीच्या पोकळ फापट गोष्टी सांगून स्त्रियांना मानसिक गुलाम बनवण्याचे काम इथल्या धर्म व्यवस्थेने केले आहे. हिंदू धर्मग्रंथ मनुस्मृतीमध्ये तर स्त्रियांना अतिशय खालचा दर्जा दिलेला आहे. मनुस्मृतीच्या पाचव्या अध्यायातील १४८ व्या श्लोकांमध्ये मनु म्हणतो की 'न स्त्री स्वतंत्र्याम अर्हती' कोणत्याही परिस्थितीत महिलेने स्वतंत्र असू नये. लहानपणी मुलीने तिच्या वडिलांच्या छत्राखाली असावं. लग्नानंतर पतीच्या. पतीचे निधन झाल्यानंतर तिने तिच्या मुलांच्या कृपेवर रहावं. म्हणजे आज स्त्रियांवर जी बंधन लादलेली आहेत. त्याचे मूळ यामध्ये असल्याचे आपणास दिसते आणि ही अघोरी प्रथा हा विचार वर्षांनुवर्षे सतत सुरू आहे. त्याला अलीकडच्या काही काळामध्ये 'संस्कृती रक्षणाचा सोनेरी मुलामा' देण्यात आलेला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य जातीत जन्मल्यामुळे जाती विषमतेच्या अपमानाचे दुःख त्यांनी जसे सोसलेले होते. अगदी तसेच उच्च वर्णीय स्त्रियांपासून तळागाळातील स्त्रियांपर्यंत सर्व स्त्रिया या व्यवस्थेमुळे शोषित व पीडीत आहेत हेही त्यांनी जाणले होते. या सर्वांच्या मुक्तीचा उपाय म्हणजे कायदा होय. हे त्यांच्या दूरदर्शी बुद्धीला पटले म्हणूनच त्यांनी महिलांना समाजामध्ये सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे व त्या सक्षम व्हाव्यात यासाठी भारतीय संविधानाच्या माध्यमातून महिलांच्या मुक्तीचा मार्ग निश्चित करून दिलेला आहे.

**विषयाची उद्दिष्टे**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री सक्षमीकरणाचे कायदेशीर अधिष्ठान अधोरेखित करणे.
2. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा वैश्विक पातळीवर उहापोह करणे.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक संघटनांचे स्थान अधोरेखित करणे.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टीचा आढावा घेणे.

5) स्त्रीमुक्तीच्या कार्यामधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रणित वैचारिक अधिष्ठान अधोरेखित करणे.

**विषयाची व्याप्ती**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या भारत देशातील एक महान समाजसुधारक आहेत. समाजशास्त्रज्ञ अर्थतज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, राजकीय विश्लेषक, संविधान अभ्यासक, थोर शिक्षणतज्ञ म्हणून ते जगदविख्यात आहेत. या सर्वच क्षेत्रांमधील त्यांचे योगदान भारताला दिशादर्शक आहे. समाजातील प्रथा परंपरा आणि संस्कृती या सर्व गोष्टींचा मुळामध्ये जाऊन त्यांनी अभ्यास करून आणि त्यातून सत्य समोर मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकमेव अभ्यासक आहेत. स्त्री पुरुष यांनी मिळून समाजाच्या, संसाराच्या अडचणी सोडविल्या पाहिजेत. यामध्ये स्त्रियांनी जर हे काम आपल्या शिरावर घेतले तर, त्या कामात लवकर यश प्राप्ती होईल असे त्यांचे मत होते. आणि म्हणूनच महिलांना त्यांच्या शक्तीची जाणीव करून देऊन त्यांना बोलायला, लढायला आणि आत्मसन्मानाने जगायला डॉ. आंबेडकरांनी बळ दिले आहे. महात्मा

ज्योतिराव फुले म्हणतात की, स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये स्त्री खऱ्या अर्थाने श्रेष्ठ आहे कारण ती एका पुरुषाला जन्म देते. अगदी हाच विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला आहे. स्त्री मुळातच कणखर लढाऊ आणि अचल आहे तिच्यातील या शक्तींची ओळख डॉ. आंबेडकरांनी खऱ्या अर्थाने त्यांना करून दिली. त्यातून स्त्रियांना आपले हक्क अधिकार आणि आत्मभानाची जाणीव झाली. डॉ. आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणाचे धोरण हे खऱ्या अर्थाने देश पातळीवरच नव्हे तर जागतिक पातळीवर दखल घेण्यासारखे आहे म्हणून प्रस्तुतचा विषय महत्त्वाचा आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणाचे धोरण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही केवळ व्यक्ती नसून तो विचार आहे. हा विचार प्रेरणादायी, आशादायी आणि प्रवाही आहे. त्यांचे जीवन आणि कार्य हे तळागाळातील हजारो वर्षाच्या सामाजिक अन्याय आणि आर्थिक शोषणामुळे भरडलेल्या लोकांच्यासाठी प्रेरणा आहे. वर्षानुवर्षे झोपलेल्या समाजाला जागृत करून त्यांच्यात स्वाभिमान, अस्मिता आणि आर्थिक सुबत्ता निर्माण करण्याबरोबरच जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा आणि देशप्रेम हे बाबासाहेबांच्या जीवनकार्याची अतूट ध्येये आहेत. त्यांचा दृष्टिकोन 'स्वराज्य हे कवळ काही मूठभर लोकांचे आणि सत्ताधीशांचे नसून ते संपूर्ण शोषित पीडित जनतेस देखील प्राप्त व्हावे' असा होता. त्यामुळे 'आपला संघर्ष हा सत्ता आणि संपत्ती पेक्षा स्वातंत्र्यासाठी असावा' असा विचार त्यांनी मांडला आहे. स्वातंत्र्य हे प्रत्येकालाच प्रिय असते त्यामुळे प्रत्येक व्यक्ती विचाराने, कृतीने स्वतंत्र असला पाहिजे असा त्यांनी विचार मांडला आहे. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्त्री आणि पुरुष ही संसार रथाची दोन चाके आहेत ती दोन्ही चाके बरोबरीने फिरल्यास हा संसार रथ यशस्वी होऊ शकतो. तत्कालीन भारतीय समाजामध्ये महिलांवर अनेक बंधने होती. याला मनुस्मृतीतील विचारांची जोड दिल्याने या बंधनांनी स्त्रियांना मानसिक व शारीरिकरित्या गुलाम बनवले होते. स्त्रिया आणि शुद्रादी जनतेवर समाज व्यवस्थेने केलेल्या अन्याय अत्याचाराची चीड व त्या शोषणाला बळी पडलेल्या विषयी करूणा यातून बाबासाहेबांनी या देशात सामाजिक क्रांती केली. त्यांची क्रांती ही भगवान बुद्धानंतरची दुसरी मोठी क्रांती होती. हिंदू समाज व्यवस्थेतील सर्व विषमता पैकी एक म्हणजे स्त्री-पुरुष विषमता होय. त्यामुळे स्त्रियांवर होणारे अन्याय दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खूप मोठे कार्य केले आहे. ज्या मनुस्मृतीने स्त्रियांवर बंधने लादली ती मनुस्मृती डॉ. आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी जाळून टाकली आणि खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. त्यापूर्वी महाड येथे झालेल्या तीन दिवसांच्या परिषदेमध्ये डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना उद्देशून भाषण केले. स्त्रियांनी आपले राहणीमान कसे सुधारावे, दारू पिऊन येणारा नवरा, भाऊ, बाप यांच्यासाठी दार उघडू नका असे त्यांनी सांगितले. दारुने संसाराची कशी धुळदान होते हे त्यांनी जाणले होते. त्यांनी महिलांना दिलेला सल्ला खूप मोलाचा आहे. त्यावेळी डॉ. आंबेडकर कोणत्याही पदावर नसताना देखील जवळजवळ पाच हजार स्त्रियांची सभा त्यांनी वेगळी घेतली होती. स्त्रियांमध्ये स्वाभिमान जागावण्याची व प्रबोधनाची भूमिका त्यांनी एकाच वेळी घेतलेली दिसते. या सभेमध्ये बाबासाहेबांनी दलित स्त्रियांच्या राहणीमानाबद्दल प्रबोधन केले. स्त्रियांनी चांगली व स्वच्छ वस्त्रे नेसण्याबद्दल व नीटनेटके राहण्याचा सल्ला त्यांनी दिला. तसेच आपल्या उद्धारासाठी तुम्ही तुमच्या मुला-मुलींना शिक्षण द्यायला पाहिजे हे सांगताना त्यांनी मुलींच्या शिक्षणावर अधिक भर दिला. या प्रबोधनाचा तात्काळ परिणाम दिसून आला. सभेवरून परतताना स्त्रियांच्या वस्त्र नेसन्याच्या पद्धतीत बदल दिसून आला. महिलांमध्ये त्यांनी स्फुलिंग चेतवण्याचे कार्य केले आहे. तत्कालीन समाजातील जात पंचायतीमध्ये महिलांना अजिबात स्थान नव्हते. देवदासी, मुरळ्या, जोगतीनी यासारख्या प्रथा महिलांच्या माथी लादल्या जात. या प्रथांना मुळासकट उकडून फेकण्याचे त्यांनी वेळोवेळी आवाहन केले होते. जोपर्यंत महिला स्वतःहून या प्रथा झुगारणार नाहीत तोपर्यंत त्यांना हक्क व न्याय कधीच मिळणार नाही याची त्यांनी महिलांना जाणीव करून दिली. त्यांनी दिलेला मोलाचा सल्ला अधिकांश महिलांनी अंगीकारला. १३ जून १९३६ रोजी मुंबईतील परळ येथील दामोदर हॉलमध्ये देवदासी, मुरळ्या, जोगतीनी आणि वेश्यांची परिषद लक्षवेधी आणि परिणामकारक अशी ठरली. या परिषदेमध्ये बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, तुम्हाला या नरकातून निघायचे आहे का? तुमची इच्छा असेल तर तुम्ही स्वतःच अशा जगण्याचा त्याग करा. स्त्रिया समाजाचा अलंकार आहेत. प्रत्येक समाज स्त्री चारित्र्याला अधिक मान देतो म्हणून तुम्ही या मलीन आयुष्याचा त्याग करा.आपला दर्जा वाढवून स्वतःचा नावलौकिक वाढवा. मी तुम्हाला हे निंद्य जीवन सोडण्यास सांगत आहे याचा अर्थ तुमच्या उपजीविकेची साधने तुमची तुम्हालाच ठरवावी लागतील. पैसा कमी मिळाला तरी चालेल पण प्रतिष्ठित कामधंद्याला लागा. त्याने तुम्हाला प्रतिष्ठा प्राप्त होईल आणि तुम्ही तुमच्या कष्टाने इतरांसाठी आदर्श व्हाल. तुम्हाला समाजात प्रतिष्ठा प्राप्त होईल. संपत्तीपेक्षा चारित्र्य महत्त्वाचे आहे डॉ. आंबेडकर मातृहृदयी होते. मुलाचे दुःख बघून आईला जसा त्रास होतो तसाच त्रास या हतबल महिलांना बघून बाबासाहेबांना झाला. त्यांच्या या सल्ल्याने भाषणांने प्रभावित होऊन सर्व स्त्रियांनी या नरक जीवनाचा त्याग केला. महिलांना आत्मभान देण्याचे खूप मोठे कार्य यातून

बाबासाहेबांनी केले असल्याचे आपणास दिसून येते. बाबासाहेबांनी महिलांना न्याय हक्कासाठी लढण्यास प्रवृत्त आणि प्रेरित केल्याचे स्पष्ट होते. स्त्रिया शिकल्या पाहिजेत एवढेच नव्हे तर त्या उच्चशिक्षित झाल्या पाहिजेत. पुरुषाप्रमाणे त्यांनाही प्रतिष्ठा असली पाहिजे असा त्यांचा मनोदय होता.स्त्रियांमध्ये जनजागृती करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी संधी मिळेल तेव्हा त्यांनी आपली भूमिका मांडली असल्याचे दिसते. ब्रिटिश राजवटीत दलित पुरुषांबरोबरच स्त्रियांना देखील क्रांतीप्रवण होण्याचे प्रशिक्षण बाबासाहेबांनी दिले कारण त्यांची प्रामाणिक धारणा होती की, स्त्रियांच्या प्रगतीवर समाजाची प्रगती अवलंबून आहे म्हणून त्यांनी म्हटले आहे की, 'एखाद्या समाजाची प्रगती मोजावयाची झाल्यास त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवर ती मोजली पाहिजे.' नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रहातील स्त्रियांचा सहभाग देखील उल्लेखनीय आहे. त्यामधील भाषणासोबत बाबासाहेबांनी लेखणीचा वापर महिला जागृतीसाठी केला. मूकनायक व बहिष्कृत भारत या वर्तमानपत्रातील जागृती कार्याने प्रभावित होऊन तुळशीबाई बनसोडे यांनी 'चोखामेळा' हे वर्तमानपत्र सुरू केले व समाजातील कुप्रथांवर घाला घालण्याचे मोठे कार्य केले. या ठिकाणी ज्याप्रमाणे ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या कार्यप्रभावाने प्रेरित होऊन ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री पुरुष तुलना' हा ग्रंथ लिहिला अगदी त्याप्रमाणेच बाबासाहेबांच्या चळवळीच्या प्रभावाने प्रेरणा घेऊन या स्त्रियांनी देखील वर्तमानपत्राच्या माध्यमातून पत्रकारितेच्या क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे.

१८,१९ व २० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे अस्पृश्य वर्गाची मोठी परिषद भरली होती. त्या परिषदेतील एक दिवस स्त्रियांची वेगळी परिषद घेण्यात आली या विशाल परिषदेमध्ये संपूर्ण भारत देशातून ७५ हजार लोक उपस्थित होते. त्यापैकी २५ हजाराहून अधिक महिलांनी हजेरी लावली होती. स्वअस्तित्वासाठी संघर्षासाठी तयार असणाऱ्या स्त्रियांची एवढी संख्या पाहून बाबासाहेबांना खूप आनंद झाला. स्त्रियांच्या स्वतंत्र व संघटित संस्था असाव्यात असे सांगून स्त्रियांनी स्वतःला कमी लेखू नये. त्यांनी पुरुषांच्या बरोबरीने असले पाहिजे. मुला मुलींच्या लग्नाची तुम्ही घाई करू नका त्यांचे शिक्षण पूर्ण करा. पती-पत्नीने एकमेकांशी कसं वागावं हे सांगताना बाबासाहेब म्हणतात की, लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणून त्याच्या प्रत्येक कार्यात सहकार्य करावे. पतीने गुलामासारखी वागणूक दिल्यास तिने खंबीरपणे नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरला पाहिजे. त्याचबरोबर स्त्रीयांनी जास्त मुले जन्माला घालू नयेत असा मौलिक सल्ला बाबासाहेबांनी दिला. प्रजनन व संतती नियमनाबाबत महिलांनी जागरूक असायला हवे असे सांगून स्त्रीयांच्या आरोग्याचे महत्व त्यांनी पटवून दिले. आज वाढती लोकसंख्या एक सामाजिक समस्या बनत चालली असताना सुमारे ८०-८५ वर्षांपूर्वी कुटुंब नियोजनाचा दिलेला सल्ला बाबासाहेबांची दूरदृष्टी अधोरेखित करतो. बाबासाहेबांचे ही परिषद स्त्री सक्षमीकरणांमध्ये मैलाचा दगड ठरली आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये स्त्रियांचे एवढे मोठे संघटन निर्माण होणे म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचे यश आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री होते. ९ एप्रिल १९४८ रोजी त्यांच्या नेतृत्वाखाली हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार करून संसदेसमोर मांडला. त्यामध्ये १३९ कलमे होती. या विधेयकाचा प्रस्ताव मांडताना डॉ. आंबेडकरांची भाषण केले ते अत्यंत नेटके, मुद्देसूद व जुन्या कायद्यांमध्ये केलेल्या प्रस्तावित बदलांचा नेमका निर्देश करणारे होते. या बिलांमुळे स्त्रियांना दत्तक विधान, विवाह उच्छेद, घटस्फोट, घटस्फोटाचा अधिकार, वारसा अधिकार व पोटगी या महत्त्वपूर्ण घटकांचा अधिकार प्राप्त झाला. हे सर्व विषय महिलांच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहेत याची आज आपल्याला जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. यामध्ये सर्वप्रथम बाबासाहेबांनी वारसा अधिकाराचा प्रश्न उपस्थित केला. वडिलांच्या मालमत्तेत मुलाबरोबर मुलीलाही अर्धा हिस्सा देण्यात आला. या बीलानुसार शास्त्रोक्त विवाह आणि सिव्हिल विवाह असे दोन विवाह मानण्यात आले. रजिस्टर सिव्हिल विवाहामध्ये वधू-वराचे वर्ण, उपवर्ण आणि गोत्र असा भेदभाव केला जाऊ नये. असे या बिलामध्ये नमूद करण्यात आले. विवाह विच्छेद या अंतर्गत वधू-वरांना कोर्टातून विवाह विच्छेद मान्य करून घेण्याचा अधिकार देण्यात आला. घटस्फोटाचा अधिकार महिलांना प्राप्त झाला. त्याचबरोबर दत्तक घेण्याच्या संदर्भात स्त्रियांना अधिकार प्रदान करण्यात आले. हिंदू कोड बिल हे बाबासाहेबांच्या जीवनाचेच बील झाले होते. १९४७ पासून सलग चार वर्षे, एक महिना, २६ दिवस अथक परिश्रम करून त्यांनी स्त्रियांना कायद्याने हक्क, न्याय, समता, दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त व्हावी अशा तळमळीने त्यांनी हे बील संसदेत आणले होते. मात्र, एवढे कष्ट करूनही हे बिल संसदेमध्ये पास होऊ शकले नाही. या बीलाबद्दल त्यांना अतिशय मनस्ताप सहन करावा लागला. याबद्दल ते म्हणतात की,In regard to this bill. I have been made to go through the greatest mental torture. अखेर आपल्या कायदेमंत्री पदाचा २१ सप्टेंबर १९५१ रोजी त्यांनी राजीनामा दिला. सनातन्यानी या बीलाबद्दल लोकांमध्ये गैरसमज पसरविला आणि याला बळी पडून काही स्त्रिया बाबासाहेबांना भेटतात व त्यांच्यावर रोष दाखवून या बिलाची निंदा करतात त्यावेळी बाबासाहेबांना

अतिशय वाईट वाटते. या बीलाबाबत आपली भूमिका मांडताना बाबासाहेब म्हणतात की, समाज व्यवस्थेतील वर्गा वर्गातील विषमता, स्त्री-पुरुष विषमता कायम ठेवणे म्हणजे शेणाच्या ढिगाऱ्यावर महाल बांधण्यासारखे आहे. हिंदू कोड बीलामुळे स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा मार्ग सुकर होणार होता. आज सद्यस्थितीत आपल्याला कळते की हिंदू कोड बिलाचा मुद्दा महिलांच्या अस्तित्वाचा खऱ्या अर्थाने जाहीरनामाच होता. यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर काही कामानिमित्त कोल्हापूरला आले असता कोल्हापुरातील काही महिलानी त्यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार करुन त्यांना धन्यवाद दिले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला संविधान दिले. संविधान हा प्रत्येक भारतीयाचा प्राण आहे. संविधानामध्ये महिलांच्या हक्कांसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये अगदी अत्यंत महत्त्वपूर्ण गोष्टींचा बाबासाहेबांनी विचार करून, खूप मेहनत घेऊन स्त्रियांना हे सुरक्षाकवच बहाल केले आहे. संविधानातील समानतेचे तत्व देशातील सर्वच जाती-धर्माच्या महिलांना अधिकार प्राप्त करून देते. आज देशांमध्ये महिला पुरुषांच्या बरोबरीनेच नव्हे तर त्याहीपेक्षा अधिक उंच झेप घेऊन लक्षवेधी भूमिका बजावत असल्याचे आपणास दिसून येते त्यामागे बाबासाहेबांच्या कार्यकर्तुत्वचीच पार्श्वभूमी आहे हे विसरून चालणार नाही. स्त्रियांना बाबासाहेबांनी घटनात्मक तरतुदी करून हक्क बहाल केले आहेत. भारतीय संविधानातील अनुसूची १४,१५,१५(३),१६,३९(अ),३९(ब),३९(क) आणि ४२ यानुसार कायद्यापुढे सर्व समान असून कोणाही व्यक्तीस समान संरक्षण नाकारण्यात येणार नाही. धर्म, वंश, जात, लिंग किंवा प्रांत यावरून भेदभाव केला जाणार नाही. सर्वांना सर्व ठिकाणी प्रवेश असेल. त्याचबरोबर सार्वजनिक सेवा योजनांच्या बाबींमध्ये सर्वाना समान संधी निर्माण करून दिली. भाषण स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्याबरोबरच देशाच्या कोणत्याही भागात राहण्याचा वास्तव्य करण्याचा व कोणताही व्यवसाय, उदीम करण्याचा सर्वांना अधिकार असेल. पुरुष व स्त्रियांना उपजीविकेचे पर्याप्त साधन मिळवण्याचा अधिकार दिला, दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन मिळण्याचा हक्क मिळवून दिला. ब्रिटिश सरकारमध्ये व भारताचे पहिले मजूरमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर महिलांच्या हितसंवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी केली असल्याचे आपणास दिसते. धनबाद येथील खाणकामगार स्त्रियांची अवस्था बघून वर्षानुवर्षे वेठबिगारीप्रमाणे काम करणाऱ्या महिलांना बाबासाहेबांनी पूर्ण वेळ व भर पगारी प्रसूती रजा मंजूर करून दिली आहे. मजूर व कष्टकरी स्त्रियांना देखील २१ दिवसांची किरकोळ, व एक महिन्याची हक्काची रजा मिळवून दिली. बाबासाहेबांच्या या काळाच्या कितीतरी पुढे असणाऱ्या दूरदृष्टीला नमन करावे तेवढे कमीच आहे. आज या सर्व सोयी-सुविधांची गोड फळे आपल्या मायलेकीना मिळत आहेत.

डॉ. बाबासाहेबांच्या कार्याला गौतम बुद्ध महात्मा फुले व संत कबीर यांच्या विचारांचा वारसा लाभला आहे. महिलांच्या गुलामीचा अंत करण्यासाठी आपले सर्व तत्त्वज्ञान बाबासाहेबांनी आपल्या भाषण व लेखनातून मांडले आहे. १९५० मध्ये 'ईव्हज वीकली' या मासिकामध्ये हिंदुस्थानातील स्त्रियांच्या अवनतीला बुद्धाची शिकवण कारणीभूत ठरली अशा आशयाचा लेख प्रसिद्ध झाला या लेखाला तर्कसंगत मांडणी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू स्त्रियांच्या अवनतीला भगवान बुद्ध जबाबदार नसून मनूच जबाबदार आहे असे सांगून भगवान बुद्धांवरील सर्व आरोपाचे खंडन करून मनूचा जबाबदारपणा सप्रमाण सिद्ध केला आहे. भगवान बुद्धांनी अडीच हजार वर्षांपूर्वी स्त्रियांसाठी ज्ञानार्जन व आध्यात्मिक उन्नती यांचा मार्ग मोकळा करून दिल्याचे बाबासाहेबांनी सिद्ध करून दाखवले व भगवान बुद्ध व मनू यांच्यातील स्त्रीविषयक दृष्टिकोनातील मूलभूत फरक आपल्यापुढे स्पष्ट करून दाखवला आहे.

**सारांश**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर माता रमाईंना पाठवलेल्या एका पत्रात म्हणतात की, 'स्त्रियांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी एक योद्धा आहे' हे अगदी खरे आहे. एका हाती कायद्याचे व दुसऱ्या हाती चळवळीचे शस्त्र घेऊन बाबासाहेबांनी ही लढाई जिंकली आहे. स्त्रियांच्या हक्क अधिकारांसाठी लढणारा असा वीर योद्धा पुन्हा होणे नाही. अस्पृश्य जातीमध्ये जन्मल्यामुळे जातीयतेची दाहक कळ त्यांनी सहन केली आहे. आपल्या भारतीय समाजातील स्त्रियांना जाचक रूढी व परंपरा पासून सुटका मिळावी यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. इतिहासकालीन स्त्रियांच्या परिस्थितीचा त्यांनी अभ्यास केला. विविध लेख, पुस्तके, लिखाण व आंदोलनातून त्यांनी आपल्या सर्व प्रयत्नांना कायद्याच्या चौकटीमध्ये बसवून, सर्व बारकावे तपासून महिला सक्षमीकरणाचे धोरण अवलंबिले असल्याचे आपणास दिसते. डॉ. आंबेडकरांनी उभारलेली स्त्रियांची चळवळ पाहता महाड सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, मुंबईतील परळच्या दामोदर हॉलमधील देवदासी मुरळी यांच्या उत्थानासाठी केलेली चळवळ, १९४२ सालची ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस विमेन्स कॉन्फरन्स, हिंदू कोड बिल आणि भारतीय संविधानाच्या माध्यमातून स्त्रियांना मिळवून दिलेले अधिकार यांचा विचार करता

डॉ. आंबेडकरांनी महिलांप्रती केलेले कार्य काळाच्या कितीतरी पुढची दृष्टी देणारे कार्य आहे. आज महिला सक्षमीकरणाच्या बाष्कळ गप्पा मारणारे लोक बघताना, आजही स्त्रियांना हीन वागणूक देऊन त्याला मनुचा दाखला देणारे महाभाग दिसतात. देशाच्या कानाकोपऱ्यात रोज एखादी मणिपूर सारखी हिंसा होत आहे. आजही वर्णाश्रमाचा आधार घेऊन महिलांना डावलण्याचे, विकासापासून वंचित ठेवण्याचे कार्य राजरोसपणे होताना दिसते. साहित्य, संस्कृती, खेळ, राजकारण, मानवी हक्क अभियान व जागतिक स्तरावर महिला सक्षमीकरणाचा विषय हा भेदाभेद करणाराच असल्याचे अधिक दिसून येते. अशावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांप्रती केलेले कार्य हे आपल्याला सर्वांनाच दिशादर्शक आहे. कुटुंबाच्या, समाजाच्या व पर्यायाने देशाच्या प्रगतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणाचे धोरण महत्त्वपूर्ण आहे. बाबासाहेबांच्या या महान कार्यामुळे ते समस्त स्त्री वर्गाचे प्रातःस्मरणीय विचारवंत आहेत हे आपल्या सर्व भारतीय नागरिकांच्या ध्यानात असले पाहिजे.

**संदर्भसूची**

1.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अतिशय गाजलेले लेख - रघुवंशी प्रकाशन दादर मुंबई २८

२) लोकराज्य ऑक्टोंबर २००६

३) लोकराज्य एप्रिल २०१८

४) विद्यार्थ्यांनो जागृत व्हा.- डॉ. बाबासाहेब आंबेडकर. प्रबुद्ध भारत पुस्तकालय नागपूर.

5.महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर. - ज्ञानराज काशिनाथ गायकवाड ‘राजवंश’. रिया पब्लिकेशन्स कोल्हापूर ऑगस्ट २०१६